क्रमांक : का.स./बैठक/२१०

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १८ फेब्रुवारी, २००५.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २४ डिसेंबर, २००४ (शुक्रवार) रोजी झालेल्या २१० व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१८.२.२००५

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

मुख्य सचिव, - अध्यक्ष
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर, - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे, - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.हरि शंकरन्, - सदस्य
कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

प्रधान सचिव (१), - सदस्य
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २१० व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २४ डिसेंबर, २००४ (शुक्रवार) |
| वेळ | : | दुपारी १२.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.रा.मे.प्रेमकुमार<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.रामानंद तिवारी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| श्री.विनय मोहन लाल<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.विश्वास धुमाळ
प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन

डॉ.टी. चंद्र शेखर
अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक

श्री.जी.एन.वराडे
संचालक, पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन
(प्रधान सचिव, उर्जा व पर्यावरण विभाग यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अड्सुमली
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
विशेष कार्य अधिकारी,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २००४ रोजी झालेल्या २०९ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २००४ रोजी झालेल्या २०९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :-

**बाब क्र.३ : मरीन ड्राईव्ह परिसराच्या पुनर्नूतनीकरणाकरीता संकल्पचित्र व देखरेख सल्लामसलत आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लामसलत यासाठी सल्लागाराची नेमणूक करणे.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या बाबी संबंधीच्या कार्यवाही अहवालातील "कार्यकारी समितीने पारित केलेल्या ठरावास प्राधिकरणाने मान्यता दिली" हे वाक्य वगळण्यात यावे. कार्यकारी समितीच्या निदेशानुसार मरीन ड्राईव्ह परिसराच्या पुनर्नूतनीकरणाचा प्रस्ताव तसेच सल्लागाराच्या नेमणूकीबाबतची माहिती प्राधिकरणाच्या दिनांक १९ नोव्हेंबर, २००४ रोजी झालेल्या ११२ व्या बैठकीमध्ये सादर केली होती. प्राधिकरणाच्या या बैठकीच्या कार्यवृत्तास मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी आता मान्यता दिली आहे.

**बाब क्र.७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि मे.लार्सन अँड टुब्रो क्रॉसरोड यांनी नरिमन पॉईंट येथील बहुमजली वाहनतळ संयुक्तरित्या चालविण्याबाबत.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या संबंधीचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या ११२ व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता व त्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. प्राधिकरणाच्या या बैठकीच्या कार्यवृत्तास मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी आता मान्यता दिली आहे.

**बाब क्र.१४ : रेल्वे वरपूलांच्या संकल्पचित्रांच्या प्रुफ तपासणीकरीता सल्लागाराच्या कार्याची व्याप्ती वाढविणे व वाढीव खर्चास मान्यता देणे.**

यासंबंधात महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या निदेशानुसार मे.शिरीष पटेल अँड असोसिएटस् यांचेबरोबर दिनांक २२ डिसेंबर, २००४ रोजी

पुन्हा वाटाघाटी केल्या असता त्यांनी त्यांची फी, वरपूलाच्या अंदाजित खर्चाच्या ०.४५% अधिक सेवाकर या ऐवजी ०.४२९५% अधिक सेवाकर अशी कमी केली आहे.

२.२ त्यानंतर, वरील बदलांसह कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : विकसनशील राष्ट्रांकरीता परिवहन नियोजन व अंमलबजावणीच्या पध्दती : पायाभूत सुविधा यंत्रणा (टिपीएमडीसी-०४) या विषयावरील ६वी आंतरराष्ट्रीय कार्यशाळा प्रायोजित करण्याबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, भारतीय तंत्र विज्ञान संस्था (आय आय टी), मुंबई या संस्थेने दिनांक १६ ते १८ डिसेंबर, २००४ या दरम्यान विकसनशील राष्ट्रांकरीता परिवहन नियोजन व अंमलबजावणीच्या पध्दती - पायाभूत सुविधा यंत्रणा या विषयावर ६वी आंतरराष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या समन्वयकांनी प्राधिकरणास अशी विनंती केली होती की, या कार्यशाळेसाठी रु.१ लाखाचे अर्थसहाय्य पेट्रन स्पॉनसरशिपद्वारे प्राधिकरणाने द्यावे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प तसेच एमआरटीएस सारख्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या नियोजन व अंमलबजावणीची कामे प्राधिकरण करीत असल्यामुळे वरील कार्यशाळा प्राधिकरणास खूपच उपयोगी होईल तसेच इतर संघटनांच्या अनुभवाबरोबर प्राधिकरणाच्या अनुभवाची देवाणघेवाण या कार्यशाळेत करता येईल या दृष्टीकोनातून या कार्यशाळेसाठी रु.१,००,०००/- ची प्रायोजनाची रक्कम देण्यात आली व आता ही बाब कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहे.

३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९३६ :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समिती याद्वारे विकसनशील राष्ट्रांकरीता परिवहन नियोजन व अंमलबजावणीच्या पध्दती - पायाभूत सुविधा यंत्रणा या विषयावरील आय आय टी, मुंबई या संस्थेने दिनांक १६ ते १८ डिसेंबर, २००४ या दरम्यान आयोजित केलेल्या ६ व्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेच्या प्रायोजनासाठी रु.१,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) इतके वित्तीय सहाय्य देण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे.”

**बाब क्र.४ :** **मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - तांत्रिक सहाय्य अंतर्गत सर्वंकष परिवहन अभ्यासासाठी मे.ली (LEA) इंटरनॅशनल लिमिटेड यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणे.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सन १९९२-९४ मध्ये जागतिक बँकेच्या सूचनेनुसार मे.डब्ल्यू एस ॲटकिन्स यांनी केलेल्या सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या आधारे विद्यमान मुंबई नागरी परिवहन प्रकल्प तयार केला आहे. सदर अभ्यास हा पूर्णतः केंद्रीय मार्ग संशोधन संस्थेने (CRRI) सन १९७७ मध्ये मुंबई महानगर प्रदेशासाठी केलेल्या घरगुती सर्वेक्षण माहितीवर आधारीत होता. ही माहिती सन १९९२ पर्यंत अद्ययावत करण्यात आली होती. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या माहितीला काही मर्यादा होत्या म्हणून नवीन माहिती गोळा करणे तसेच नागरी परिवहन योजनेची नवीन प्रतिकृती (new transportation model) विकसित करणे आवश्यक आहे. म्हणून जागतिक बँकेने सुचविल्याप्रमाणे नव्याने सर्वंकष परिवहन अभ्यास करण्याचे प्रस्तावित आहे. या अभ्यासांतर्गत इतर बाबींबरोबरच, मुंबई महानगर प्रदेशातील कुटूंबांचे सामाजिक - आर्थिक सर्वेक्षण, जमिनीचा वापर आणि प्रवासाचे साधन यांची माहिती गोळा करण्यात येणार आहे. या अभ्यासासाठी, जागतिक बँकेने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार, प्राधिकरणाने जागतिक स्तरावर निविदा मागविल्या होत्या. तसेच विचारार्थ विषयासह (TOR) प्रस्तावाचे विनंती अर्ज (Request for proposal) इत्यादींना जागतिक बँकेची मान्यता घेण्यात आली आहे. संमंत्रकांकडून प्राप्त झालेल्या तांत्रिक व वित्तीय प्रस्तावांचे मूल्यमापन करण्यासाठी आणि संमंत्रकांची निवड करण्यासाठी एक मूल्यमापन-नि-वाटाघाटी समिती स्थापन केली होती. या समितीने तयार केलेल्या तांत्रिक मूल्यमापन अहवालास जागतिक बँकेची मंजूरी मिळाल्यानंतर तीन भागीदारी संस्थांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात आले आणि त्यांचे वित्तीय मूल्यमापन करण्यात आले. एकत्रित मूल्यमापनाच्या आधारे, मे.ली इंटरनॅशनल लिमिटेड या कॅनडाच्या प्रथम स्थान मिळविणा-या संस्थेला चर्चेसाठी बोलावण्याची समितीने शिफारस केली. तसेच एकत्रित मूल्यमापनाचा अहवाल जागतिक बँकेकडे पाठविल्यानंतर जागतिक बँकेने या संस्थेबरोबर चर्चा करायला संमती कळविली. त्यानुसार मे.ली इंटरनॅशनल लिमिटेड या कॅनडाच्या संस्थेबरोबर वाटाघाटी करण्यात आल्या. त्यानंतर, मे.ली इंटरनॅशनल लिमिटेड, कॅनडा यांची ली असोसिएटस् साऊथ एशिया प्रायव्हेट लिमिटेड, भारत यांच्या संयुक्त विद्यमाने अभ्यासकार्य पार पाडण्यासाठी नियुक्ती करण्याच्या कंत्राट कराराचा नमुना जागतिक बँकेकडे पाठविला आणि बँकेने

त्यास मान्यता दिली आहे. या कामासाठी येणारा खर्च इतर सर्व करांसह रुपये ४,२४,२८,४००/- + कॅनडीयन $ १०,८५,६८०/- असा एकत्रित खर्च एकूण सुमारे रुपये ७,८९,५०,६७५/- इतका होईल. त्यानुसार मे.ली इंटरनॅशनल लिमिटेड, कॅनडा यांना ली असोसिएटस् साऊथ एशिया प्रायव्हेट लिमिटेड, भारत यांच्या संयुक्त विद्यमाने हा अभ्यास करण्यासाठी नियुक्त करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

४.२ मा.अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचा पुढील टप्पा म्हणजे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ जागतिक बँकेच्या कर्जसहाय्याने हाती घेण्याचा प्रस्ताव आहे. या प्रकल्पातील योजनांची निवड आता हाती घ्यावयाचा सर्वंकष परिवहन अभ्यासाद्वारे करण्यात येईल.

४.३ श्री.विश्वास धुमाळ, प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांनी विचारणा केली असता अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, विद्यमान मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सदर सर्वंकष परिवहन अभ्यासासाठी जागतिक बँकेचे कर्ज उपलब्ध होणार आहे. तसेच सदर अभ्यास सुमारे १८ महिन्यात पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. मा.अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सूचविले की, या अभ्यासकार्याच्या सुरुवातीला मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक बोलविण्यात यावी जेणेकरुन अभ्यासकार्याला मार्गदर्शन मिळेल.

४.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९३७</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत सर्वंकष परिवहन अभ्यास करण्यासाठी मे.ली इंटरनॅशनल लिमिटेड, कॅनडा यांची ली असोसिएटस् साऊथ एशिया प्रायव्हेट लिमिटेड, भारत यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सर्व करांसह

रु.४,२४,२८,४००/- (रुपये चार कोटी, चोवीस लाख अठ्ठावीस हजार चारशे मात्र) अधिक कॅनडीयन $ १०,८५,६८०/- (कॅनडीयन डॉलर दहा लाख पंच्याऐंशी हजार सहाशे ऐंशी मात्र) इतक्या फी वर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे. "

**बाब क्र.५ : वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावर जलद वाहतूक व्यवस्थेची (MRTS) अंमलबजावणी – मालकांच्या सल्लागारांची (Owner's Consultant) नेमणूक करण्याबाबत.**

५.१ या प्रस्तावासंबंधी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने मुंबई मेट्रो प्रकल्पाची बृहत योजना तयार केली आहे. त्यामध्ये त्यांनी अंधेरी-घाटकोपर मार्गाचा पश्चिमेकडे वर्सोवापर्यंत विस्तार करावा अशी शिफारस केली असून वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गाला उच्चतम प्राधान्यक्रम दिला आहे. हा प्रकल्प खाजगी-सार्वजनिक भागीदारीने राबवावयाचा आहे. यासाठी तयार करण्यात यावयाच्या स्पेशल पर्पज व्हेईकल (SPV) मध्ये प्राधिकरण सहभागी असेल. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MRTS) हा प्रकल्प खाजगी-सार्वजनिक सहभाग तत्वावर उभारण्याच्या प्रस्तावास कार्यकारी समिती, प्राधिकरण तसेच राज्य शासनाने मान्यता दिली असून मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. यासंबंधीच्या कार्यवाहीमधील मालकांच्या सल्लागारांची नेमणूक करणे ही एक मुख्य कार्यवाही आहे. सदर सल्लागार प्राधिकरणास विविध प्राधिकरणांकडून प्रकल्पास आवश्यक ती मान्यता मिळविण्यात मदत करणे, प्रकल्पास आवश्यक असलेल्या भूसंपादनाच्या कार्यवाहीत मदत करणे, निविदा प्रक्रिया, निविदा मूल्यमापन, खाजगी निविदाकाराची निवड, कन्सेशन ॲग्रीमेंट व शेअरहोल्डर ॲग्रीमेंट बनविणे, स्पेशल पर्पज व्हेइकलची स्थापना करणे इत्यादी आघाडयांवर मदत करील. मालकांच्या सल्लागारांची कार्यमर्यादा ही खाजगी निविदाकाराची निवड तसेच कन्सेशन ॲग्रीमेंट व शेअर होल्डर ॲग्रीमेंट पूर्ण करेपर्यंत मर्यादित असेल. या संदर्भात कार्यकारी समितीने दिनांक १८ मे, २००४

रोजी झालेल्या २०७ व्या बैठकीत मान्यता दिल्याप्रमाणे ७ कंपन्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आले. त्यापैकी, मे.लुईस बर्जर, मे.राईटस व मे.सोविल यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाले. सल्लागारांच्या निवडीची शिफारस करण्याच्या दृष्टीने प्रस्तावांचे तांत्रिक व आर्थिक मूल्यमापन करण्याकरीता मूल्यमापन व वाटाघाटी समिती स्थापन केली. सदर ३ निविदाकारांच्या तांत्रिक व आर्थिक प्रस्तावांच्या सखोल परिक्षणानंतर या समितीने असे निदर्शनास आणले की, दरमहा उपलब्ध करावयाच्या व मुख्य कार्यपदांवर काम करणा-या मनुष्यबळामध्ये मोठी तफावत आहे. गटप्रमुख तसेच इतर विशेषज्ञांना खासकरुन रोलिंग स्टॉक, कायदे विशेषज्ञ इ. यांना सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MRTS) प्रकल्प BOOT तत्वावर यशस्वीरित्या अंमलबजावणी केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच त्यांना नागरी सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेला (MRTS) आवश्यक असणा-या अद्ययावत तंत्राची माहिती असणे आवश्यक आहे. सदर प्रकल्प हा BOOT या प्रकारचा देशातील पहिलाच प्रकल्प असल्याने त्याच्या संदर्भाच्या अटी (TORS) हाती असलेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आल्या होत्या. सदर ३ प्रस्तावांच्या अभ्यासांतर्गत असे आढळले की, संदर्भाच्या अटी तयार करताना वरील बाबींवर जोर देण्यात आला नसल्यामुळे प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये एकसूत्रीपणाचा अभाव आहे जो दूर करणे आवश्यक आहे. म्हणून मूल्यमापन समितीने गटप्रमुख, रोलिंग स्टॉक विशेषज्ञ, रेल सिस्टीम विशेषज्ञ, कायदे विशेषज्ञ, ज्यांना BOOT तत्वावर खाजगी-सार्वजनिक सहभागाने सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MRTS) राबविण्याचा अनुभव असेल त्यांच्या दरमहा मनुष्यबळाबद्दल सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने संदर्भाच्या अटी (TOR) सुधारीत करण्याची शिफारस केली. तसेच समितीने अशीही शिफारस केली की, प्रत्येक निविदाकारास संलग्न असणा-या कायदे विशेषज्ञास कमीत कमी एक सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MRTS) प्रकल्प BOOT तत्वावर कन्सेशन ॲग्रीमेंटमार्फत राबविण्याचा अनुभव असावा. गटप्रमुख व रोलिंग स्टॉक विशेषज्ञास BOOT तत्वावर राबवावयाच्या सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MRTS) प्रकल्पाचा संबधित अनुभव असावा व ते प्रकल्पावर शेवटपर्यंत कार्यरत रहावेत. समितीच्या शिफारशीनुसार संदर्भाच्या अटींमध्ये समितीने सुचविलेले बदल करण्यात आले. सुधारीत संदर्भ-अटी वरील ३ कंपन्यांना कळवून त्यांचे प्रस्ताव पुन्हा मागविण्यात आले. त्यानंतर प्राप्त प्रस्तावांचे तांत्रिक व आर्थिक मूल्यमापन करण्यात आले. एकत्रित मूल्यमापनानुसार मे.लुईस बर्जर यांच्या कंपनीने एकत्रित मूल्यमापनात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्यानंतर, आर्थिक प्रस्तावात सवलत मिळविण्याची शक्यता पडताळण्याच्या दृष्टीने मे.लुईस बर्जर असोशिएटस् यांच्याबरोबर वाटाघाटी

केल्या असता मे.लुईस बर्जर असोशिएटस् यांनी त्यांचा आर्थिक प्रस्ताव मे.राईटस् यांच्या रु.३,२८,८७,५१७/- एवढया लघुत्तम वित्तीय प्रस्तावाइतका खाली आणण्यास संमती दर्शविली. परंतु निविदा प्रक्रियेत व तत्सम् कार्यालयीन बाबींमध्ये गुप्तता ठेवण्याच्या दृष्टीने सल्लागारांनी प्राधिकरणाच्या इमारतीत काम करण्यासाठी प्राधिकरणाकडे १० x १० फूट एवढी कार्यालयीन जागा नाममात्र भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. आता मेसर्स लुईस बर्जर असोशिएटस् यांची डी.ई.कन्सल्ट (जर्मनी), प्राईस वॉटर हाऊस कूपर्स (भारत), मेसन्स (इंग्लंड) व बालाजी रेल रोड सिस्टीम्स् लिमिटेड यांच्या सहकार्याने रु.३,२८,८७,५१७/- (सर्व करांसहित) (सेवाकर + अधिभार वगळून) खर्चासह मालकांचे सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

५.२ यासंबंधात अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, खाजगी-सार्वजनिक भागिदारीने प्रकल्प राबविण्याचा मे.राईटस् यांना अनुभव नाही. तसेच मे.लुईस बर्जर यांनी अशाप्रकारचा प्रकल्प बँकॉक येथे राबविला आहे.

५.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९३८</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (दोन) व (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मार्गावर सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकरणास निविदा प्रक्रियेमध्ये, निविदाकारांच्या मूल्यमापन व नेमणूकीमध्ये, कन्सेशन ॲग्रीमेंट तसेच शेअर होल्डर ॲग्रीमेंट बनविण्यामध्ये, स्पेशल पर्पज व्हेईकल स्थापन करणे इत्यादीसाठी मदत करण्यासाठी मेसर्स लुईस बर्जर असोशिएटस् यांची डी.ई.कन्सल्ट (जर्मनी), प्राइस वॉटर हाऊस कूपर्स (भारत), मेसन्स (इंग्लंड) व बालाजी रेल रोड सिस्टीम्स् लिमिटेड (भारत) यांच्या सहकार्याने रु.३,२८,८७,५१७/- इतक्या खर्चासह (सर्व करांसह मात्र सेवा कर व अधिभार वगळून) मालकांचे सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्प - छत्रपती शिवाजी विमानतळ, डोमेस्टिक टर्मिनल येथे पश्चिम द्रुतगती महामार्गावर उड्डाणपुलाच्या उभारणीकरीता संकल्पचित्र तयार करण्याकरीता व प्रकल्प व्यवस्थापनाकरीता मेसर्स डार कन्सल्टंटस् यांची महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे नेमणूक करण्याबाबत.**

६.१ या प्रस्तावासंबंधी महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतला आहे. दिनांक ६ ऑगस्ट, २००४ रोजी झालेल्या २०८ व्या बैठकीत कार्यकारी समितीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ९ उड्डाणपूलांच्या उभारणीकरीता प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नेमणूक करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास त्या त्या रस्त्यांच्या उभारणीकरीता प्राधिकरणाने नेमणूक केलेल्या संकल्पचित्र व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या सेवांचा वापर करुन घेण्यास सांगण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी विमानतळ, डोमेस्टिक टर्मिनल येथे पश्चिम द्रुतगती महामार्गावर उड्डाणपूलाचे महत्व लक्षात घेता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सदर उड्डाणपूल हा विशेषरीत्या संस्मरणीय उड्डाणपूल (Signature Bridge) म्हणून उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने या उड्डाणपूलासाठी अगोदर मे. टेक्नोजेम या सल्लागारांची संकल्पचित्र व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक केली होती. तथापि, मे. टेक्नोजेम यांनी सदर काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. मे.डार कन्सल्टंट, यू.के. यांना जे.जे. येथील उड्डाणपूल, वांद्रे-वरळी समुद्रसेतु तसेच पुणे येथील उड्डाणपूलाचा अनुभव असल्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मे.टेक्नोजेम यांच्या जागी मे.डार कन्सल्टंट यांच्या सेवा वापरण्याची इच्छा दर्शविली आहे. त्यासंबंधात मे.डार कन्सल्टंट यांनी बांधकाम खर्चाच्या ५.५०% अधिक सेवाकर एवढया शुल्काचा प्रस्ताव सादर केला आहे. मे.डार कन्सल्टंट यांच्याकडे असलेला पूर्वानुभव विचारात घेता त्यांची सोल सोअर्स बेसीसवर नियुक्ती करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

६.२ यासंबंधात श्री.रामानंद तिवारी, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, सदर प्रस्तावित उड्डाणपूल हा संस्मरणीय उड्डाणपूल म्हणून बांधावयाचा आहे. त्यामुळे या उड्डाणपूलाचे संकल्पचित्र अतिशय उत्कृष्ट दर्जाचे असणे आवश्यक आहे. म्हणून मे.डार कन्सल्टंट यांची सोल सोअर्स बेसीसवर नेमणूक करण्याऐवजी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच निविदाकारांना प्रस्तावित उड्डाणपूलाचे संकल्पचित्र तयार करुन निविदेबरोबरच सादर करण्यास सांगावे जेणेकरुन उत्कृष्ट दर्जाच्या संकल्पचित्राची निवड करता येईल.

६.३ प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्या वरील सूचनेस कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**<u>बाब क्र.७ :</u> <u>जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या टप्पा क्र.२ च्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणे.</u>**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, जागतिक बँकेने मंजूर केलेल्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामध्ये जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याचे रुंदीकरण व सुधारणा करण्याचा प्रस्ताव अंतर्भूत आहे. जोगेश्वरी-विक्रोळी हा जोडरस्ता सध्या अस्तित्वात असून दुपदरी आहे. सदर रस्ता पश्चिम द्रुतगती महामार्ग ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांना जोडतो व त्याचे दोन टप्पे आहेत. टप्पा-१ (भाग - १ व ३) पश्चिम द्रुतगती महामार्गापासून लार्सन अँड टुब्रो नाक्यापर्यंत व लालबहादूर शास्त्री मार्गापासून पूर्व द्रुतगती महामार्गापर्यंत, तर टप्पा-२ (भाग-२) लार्सन अँड टुब्रो नाक्यापासून ते लाल बहादूर शास्त्री मार्गापर्यंत, असा आहे. टप्पा-१ (भाग १ व ३) च्या कामास जुलै, २००३ मध्ये सुरुवात झाली आहे. भूसंपादनातील अडचणी व अतिक्रमणे यामुळे टप्पा-२ चे काम यापूर्वी हाती घेता आले नाही. टप्पा-२ साठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामासाठी मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) यांची नेमणूक करुन देकारांचे दस्तऐवज तयार करुन जागतिक बँकेकडून त्यास मंजूरी मिळाली आहे. तसेच या कामाच्या बांधकामासाठी कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात आल्या असून निविदांसंबंधात मूल्यमापन समितीच्या अहवालास जागतिक बँकेने मान्यता दिली आहे. जागतिक बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कामावर देखरेख करणे, कामाचा प्रगती अहवाल तयार करणे तसेच कंत्राटदारांची देयके तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या असून मूल्यमापन समितीने केलेल्या तांत्रिक बाबींच्या मूल्यमापनास जागतिक बँकेने मान्यता दिली आहे. तसेच तांत्रिक बाबी आणि वित्तीय

देकारांचे एकत्रित मूल्यमापन करुन अंतिम शिफारशींनाही जागतिक बँकेने मंजूरी दिली आहे. या एकत्रित मुल्यमापनानुसार मे.कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांच्या प्रस्तावास प्रथम क्रमांक देण्यात आला आहे. त्यानुसार जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या टप्पा-२ च्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मेसर्स कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लिमिटेड या संस्थेची शिफारस मुल्यमापन समितीने केली आहे व त्यास जागतिक बँकेनेही मान्यता दिली आहे. या संस्थेने सदर कामासाठी रु.१,०९,९३,०००/- अधिक सेवाकर मिळून एकूण रु.१,१८,७२,४४०/- इतका देकार दिला आहे. जागतिक बँकेकडून सदर खर्चाच्या ८०% रक्कम प्रतिपूर्तीने कर्जरुपाने शासनास मिळेल. या सल्लगार कंपनीला तांत्रिक व आर्थिक एकत्रित मूल्यांकनामध्ये जास्तीत जास्त गुण मिळाले आहेत. म्हणून या संस्थेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली आहे.

७.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९३९ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (दोन) व (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे. कन्सल्टींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इंडिया) प्रा.लि. यांची जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता टप्पा-२ च्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून एकूण रु.१,१८,७२,४४०/- (सर्व करांसहीत) इतक्या फी वर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ :** **मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प - गटवारी 'क' अंतर्गत सखोल अभियांत्रिकी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक.**

८.१ या बाब टिप्पणी संबंधात माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २००४ रोजी झालेल्या २०० व्या बैठकीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी सखोल अभियांत्रिकी व प्रकल्प व्यवस्थापन करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्यास मान्यता दिली. गटवारी 'अ' (फक्त रस्त्यांची कामे) व 'ब' (उड्डाणपूल) मध्ये येणा-या कामांसाठी २५ सल्लागारांची निवड करण्यास आणि गटवारी 'क' (उन्नत मार्ग) मध्ये येणा-या कामांसाठी ६ सल्लागारांच्या देय शुल्कास मान्यता दिली. कार्यकारी समितीने मान्यता दिलेल्या निवडपात्र सल्लागारांच्या प्रस्तावांची वैधता डिसेंबर, २००३ पर्यंत आहे, ती वाढवून डिसेंबर, २००५ पर्यंत करण्याची कार्यकारी समितीस विनंती करण्यात येत आहे. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाने दिनांक १४ मे, २००४ रोजी झालेल्या १०५ व्या बैठकीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या बृहत आराखडयाला मान्यता दिली व प्राधान्यक्रम-१ मधील कामांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत केले आहे. या कामांमध्ये ४ रस्त्यांचा समावेश आहे जी गटवारी 'क' मध्ये अंतर्भूत आहेत. यासाठी संक्षिप्त सूचीतील सल्लागारांकडून जुलै, २००३ मध्ये, म्हणजे सल्लागारांच्या प्रस्तावांची वैधता डिसेंबर, २००३ मध्ये संपण्यापूर्वी, स्पर्धात्मक प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्रस्ताव मागविताना सल्लागारांना कळविलेल्या अटींप्रमाणे व मार्गदर्शक तत्वांनुसार समितीने प्राप्त झालेल्या तांत्रिक प्रस्तावांचे मूल्यमापन केले. प्राधान्य असलेल्या व ज्यांच्यासाठी मेगासिटी आणि असाईड (ASIDE) योजनेंतर्गत निधी, सल्लागाराच्या फी सहीत, आश्वासित केला आहे अशा कामांचे मूल्यमापन पूर्ण झाले आहे. मूल्यमापनांवर आधारीत कमाल गुणधारक सल्लागारांची, पूर्व मुक्त मार्ग (म्युझियम ते पूर्व द्रुतगती महामार्ग) व सहार उन्नत मार्ग (पश्चिम द्रुतगती महामार्ग ते छत्रपती शिवाजी आंतरर्देशीय विमानतळ) या कामांसाठी, या आधी कार्यकारी समितीने मंजूर केल्याप्रमाणे नेमणूक करण्यात आली आहे. मेगासिटी आणि असाईड योजनेंतर्गत निधी, सल्लागाराच्या फी सहीत, आश्वासित केला असल्यामुळे कार्यकारी समितीने प्राधिकृत केल्याप्रमाणे सदर पूर्व मुक्त मार्गासाठी (अणिक-पांजरपोळ जोडरस्त्याच्या प्रकल्प व्यवस्थापनासह)

सल्लागाराच्या नेमणूकीस कार्यादेश देण्यात आले आहेत. सल्लागारांचे अंतिम अहवाल पुढील ६ महिन्यात उपलब्ध होतील.

८.२ या संबंधात अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, अणिक-पांजरपोळ जोडरस्त्याचे सर्वंकष अभियांत्रिकी अभ्यास यापूर्वीच पूर्ण झाले असून त्यानुसार निविदाही मागविण्यात आल्या आहेत.

८.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९४०</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी सर्वंकष अभियांत्रिकी आराखडे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लामसलतीकरीता सल्लागारांच्या प्रस्तावांची वैधता डिसेंबर, २००५ पर्यंत वाढविण्यास मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.९</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांसाठी मौजे अणिक, भक्ती पार्क आराखडयात बांधण्यात येणारे कायमस्वरुपी निवासी गाळे - सरळ पोच मार्गावरील पुलाच्या कामाकरीता मंजूरी मिळणेबाबत.</u>**

९.१ या बाब टिप्पणीची पार्श्वभूमी विषद करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मे.अणिक डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्यामार्फत भक्ती पार्क येथे १६७५ सदनिका बांधण्याचे काम पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहे. तसेच या सदनिकातील रहिवाशांना अणिक-वडाळा रस्त्याचा वापर करण्यासाठी माहूल खाडीवर एका पूलाचे बांधकाम करणे आवश्यक आहे. यासाठी सदरील बांधकाम मे.अणिक डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांना अंदाजित दर वा त्यापेक्षा प्रत्यक्षात कमी खर्च आल्यास त्या कमी खर्चाने देणे बाबतची बाब टिप्पणी कार्यकारी समितीच्या २०९ व्या बैठकीत सादर करण्यात आली होती. त्यावेळी फेरनिविदा मागविण्याचे निदेश देण्यात आले होते. त्यास अनुसरुन फेरनिविदा सार्वजनिकरित्या मागविण्यात आल्या व त्यास प्रतिसाद म्हणून दोन निविदादारांनी आपल्या सिलबंद

निविदा सादर केल्या. त्याप्रमाणे लघुत्तम निविदेतील दर हे अंदाजपत्रकापेक्षा ४१.४०% जादा दराचे आहेत. म्हणून सदरील पूलाचे बांधकाम मे.अणिक डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांना अंदाजपत्रकीय किंमत वा प्रत्यक्ष बांधकामाची किंमत कमी झाल्यास ती किंमत या अटीवर देणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

९.२ या अनुषंगाने झालेल्या चर्चेत श्री.विश्वास धुमाळ, प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, उर्जा व कामगार विभाग तसेच श्री.विनय मोहन लाल, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी असे सुचविले की, सदरील पूलाचे बांधकाम मे.अणिक डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांना दिल्यास या पूलाचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत त्यांचा सध्याचा अस्तित्वातील जोडरस्ता सदनिकेतील रहिवाशांसाठी विनाअट वापरण्यास देण्यास त्यांनी अनुमती देणे आवश्यक आहे. कार्यकारी समितीने या सूचनेस मान्यता दिली व त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९४१</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा अंतर्गत मौजे अणिक, भक्तीपार्क आराखडयात बांधण्यात येणा-या कायमस्वरुपी निवासी गाळयांसाठी सरळ पोच मार्गावरील पूलाच्या कामाकरीता मे.अणिक डेव्हलपमेंट कार्पोरेशन यांचा देकार अंदाजित खर्च (रु.१,२०,८६,१९३/-) किंवा प्रत्यक्षात आलेला बांधकाम खर्च यापैकी जो कमी असेल तो स्वीकारण्यास, मंजूरी देत आहे. सदर कामासाठीचा खर्च हा विकासकाकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे उपलब्ध होणा-या पायाभूत सुविधासाठीच्या शुल्कातून करण्यात यावा. प्राधिकरणाच्या निधीतून प्रस्तावित खर्च करु नये.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्त्यांची कामे - रस्त्यालगतच्या जलवाहिनी टाकण्याच्या भाग १ ते भाग ४ च्या कामासाठी प्रशासकीय मंजूरी व भाग १ ते भाग ४ च्या लघुत्तम निविदांना मंजूरी मिळणेबाबत.**

१०.१ या बाब टिप्पणीची पार्श्वभूमी विषद करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या १६ रस्त्यांच्या कामांमध्ये काही ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या प्रस्तावित कॉंक्रीट धावपट्टीत गाडल्या जाणार आहेत. त्यासाठी पेव्हर ब्लॉक स्ट्रीप्समध्ये नवीन जलवाहिन्या टाकणे आवश्यक आहे. त्यासाठी चार भागांमध्ये अंदाजपत्रके तयार करण्यात आली व सार्वजनिकरित्या निविदा मागविण्यात आल्या. प्राप्त झालेल्या पुढील निविदांना त्यासमोर दर्शविलेल्या किंमतीस मंजूरी देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे :-

| अ.क्र. | कामाचे नांव | लघुत्तम निविदाकार | दिलेला दर |
|---|---|---|---|
| १. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - १ (अंदाजित खर्च रु.५,३५,५०,००१/-) | मे.एस.बी.खक्कल | ५.४५% कमी |
| २. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - २ (अंदाजित खर्च रु.५,०३,३७,००४/-) | मे.एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर | ३.८७% कमी |
| ३. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - ३ (अंदाजित खर्च रु.५,५६,९२,००४/-) | मे.एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर | ५.२२% कमी |
| ४. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - ४ (अंदाजित खर्च रु.४,८१,९५,००१/-) | मे.एस.बी.खक्कल | ३.७८% कमी |

१०.२ महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, लघुत्तम निविदेतील दर जरी अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा काहीसे कमी असले तरीही ते सध्याच्या बाजारभावाप्रमाणे रास्त आहेत व या दराने काम करण्यास अडचण उद्भवण्याची शक्यता नाही.

१०.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९४२ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या मुंबईच्या पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता भाग १ ते भाग ४ प्रमाणे तयार करण्यात आलेल्या एकूण रु.२०,७७,७४,०१०/- च्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देत आहे. तसेच भाग १ ते ४ करीता खाली दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे लघुत्तम निविदा स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | ठेकेदाराचे नांव | लघुत्तम दर व त्याप्रमाणे किंमत |
|---|---|---|---|
| १. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - १ | मे.एस.बी.खक्कल | ५.४५% कमी रु.४,७२,७५,०००/- |
| २. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - २ | मे.एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर | ३.८७% कमी रु.४,५१,८१,१००/- |
| ३. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - ३ | मे.एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर | ५.२२% कमी रु.४,९२,८५,६००/- |
| ४. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील जलवाहिनी टाकण्याचे काम - भाग - ४ | मे.एस.बी.खक्कल | ३.७८% कमी रु.४,३२,९९,०००/- |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अणिक-पांजरपोळ जोडरस्त्याच्या कामाच्या लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

११.१ या प्रस्तावाची पार्श्वभूमी विषद करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अणिक-पांजरपोळ जोडरस्ता हा पूर्व मुक्तमार्ग (इस्टर्न फ्री वे) चा भाग असून याची लांबी सुमारे ५ कि.मी. आहे. तसेच सध्या या लांबीत रस्ता अस्तित्वात नाही. या रस्त्याच्या बांधकामासाठी सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन सार्वजनिकरित्या निविदा मागविण्यात आल्या. त्यास प्रतिसाद म्हणून मे.मधूकॉन प्रोजेक्टस् मर्यादित यांची रु.१४८,०३,२५,३२२/- या अंदाजित दराची निविदा लघुत्तम आहे. या निविदेस मंजूरी देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

११.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९४३ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मेसर्स मधुकॉन प्रोजेक्टस् मर्यादित यांच्या रु.१४८,०३,२५,३२२/- (रुपये एकशे अठ्ठेचाळीस कोटी तीन लक्ष पंचवीस हजार तीनशे बावीस मात्र) एवढया रक्कमेच्या सर्वात लघुत्तम सुसंवादी देकारास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय कामाचा ठेका देणे व त्याची यशस्वी पूर्तता करणे यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१२ :</u>** **<u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत रस्त्यांची कामे - रस्त्यालगतच्या मलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामासाठी प्रशासकीय मंजूरी व लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.</u>**

**१२.१** या प्रस्तावासंबंधी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या १६ मुख्य रस्त्यांची कॉंक्रीट धावपट्टीतील कामे करताना सध्या अस्तित्वात नसणा-या काही मलनिःसारण वाहिन्यांचे काम रस्त्याच्या कामाबरोबर करणे आवश्यक आहे. या संदर्भातील तांत्रिक तपशिल बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांकडून प्राप्त करुन घेण्यात आला आहे. त्याप्रमाणे सविस्तर अंदाजपत्रके दोन भागात बनविण्यात आली. त्यासाठी सार्वजनिकरित्या निविदा मागविण्यात आल्या. त्यास प्रतिसाद म्हणून पुढील निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्राप्त झालेल्या निविदा | दिलेला दर |
|---|---|---|---|
| १. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील मलनिःसारण वाहिनी टाकण्याचे काम भाग - १ (अंदाजित खर्च रु.५.०० कोटी) | मे.गुप्ता आणि कंपनी | २६.७०% अधिक |
| २. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील मलनिःसारण वाहिनी टाकण्याचे काम भाग - २ (अंदाजित खर्च रु.६.१६ कोटी) | १) मे.इगल कन्स्ट्रक्शन कंपनी<br>२) मे.गुप्ता आणि कंपनी<br>३) मे.राम बिल्डर्स<br>४) मे.स्कावे कन्स्ट्रक्शन कंपनी | ४.५०% अधिक<br>१५.७०% अधिक<br>१७.९९% अधिक<br>८.८८% अधिक |

वरीलपैकी भाग-१ साठी मे.गुप्ता आणि कंपनी यांची प्राप्त झालेली लघुत्तम निविदा २६.७०% जादा दराची असल्यामुळे त्यांच्याशी दर कमी करण्याबाबत वाटाघाटी करण्यात आल्या. परंतु त्यांनी त्यांचे निविदेतील दर कमी करुन भाग-२ या निविदेतील दराएवढे करण्यास नकार दिला. त्यामुळे या भागाची निविदा रद्द करण्यात येत असून फेरनिविदा मागविण्यात येत आहेत. तसेच भाग-२ साठी मे.इगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांची ४.५०% जादा दराची निविदा लघुत्तम आहे. निविदेतील दर कमी करणेबाबत त्यांच्याशी वाटाघाटी करण्यात आल्या त्यावेळी त्यांनी आपले दर १ टक्क्याने कमी करुन ४.५०% ऐवजी ३.५०% जास्त असे केले. त्याप्रमाणे भाग-२ साठी मे.इगल कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या वाटाघाटीनंतरच्या कमी केलेल्या ३.५०% जास्त दराने या निविदेस मंजूरी मिळणे प्रस्तावित आहे. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, भाग-१ व २ या अंतर्गतची कामे वेगवेगळया रस्त्यावर असून भाग-१ अंतर्गतचे काम झाले नाही तरी भाग-२ चे काम पूर्ण करुन ते कार्यान्वित करणे शक्य आहे.

१२.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९४४</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या मुंबईच्या पूर्व व पश्चिम उपनगरातील मलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामाकरीता, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे, भाग १ ते भाग २ प्रमाणे तयार करण्यात आलेल्या एकूण रु.११,१६,००,०००/- च्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देत आहे. तसेच भाग-२ करीता खाली दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे लघुत्तम निविदा स्वीकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | ठेकेदाराचे नांव | लघुत्तम दर व त्याप्रमाणे किंमत |
|---|---|---|---|
| १. | मुंबई शहरातील पूर्व व पश्चिम उपनगरातील मलनिःस्सारण वाहिनी टाकण्याचे काम - भाग - २ | मे.इगल कन्स्ट्रक्शन कंपनी | ३.५०% अधिक (रु.२,२७,७०,०००/-) |

सदर कामासाठीचा खर्च हा शासनाने प्राथम्य-१ साठी मंजूर केलेल्या एकूण रु.१०८७.८० कोटी पैकी युटीलीटी स्थलांतरासाठी तरतूद केलेल्या एकूण रु.६६.६५ कोटी मधून करणे आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या मंजूरीच्या प्रतिक्षेशिवाय निविदेनुसार आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता करणे आदींसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या मजबुतीकरणाच्या (भाग-II) कंत्राटास मान्यता देणेबाबत.**

१३.१ या प्रस्तावाविषयी, माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता हा जोगेश्वरी येथे पश्चिम द्रुतगती महामार्गापासून सुरु होऊन विक्रोळी येथे पूर्व द्रुतगती महामार्गास मिळतो. या रस्त्याचे मजबूतीकरण मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत हाती घेण्यात आले असून भाग-१ व ३ म्हणजे पश्चिम द्रुतगती महामार्ग ते साकी विहार रस्त्यावरील चौक तसेच लालबहादूर शास्त्री मार्गावरील चौक ते पूर्व द्रुतगती महामार्ग या लांबीत सध्या काम प्रगतीपथावर आहे. सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे या जोडरस्त्याच्या भाग-२ च्या म्हणजे साकी विहार रस्त्यावरील चौक ते लालबहादूर शास्त्री मार्गावरील चौक या ४.४ कि.मी. लांबीतील कामासाठी मे.युनिटी इन्फ्रा प्रोजेक्टस् मर्यादित यांची लघुत्तम निविदा कार्यकारी समितीच्या मंजूरीसाठी सादर केली आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर लघुत्तम निविदा स्वीकारण्यास जागतिक बँकेने मान्यता दिली आहे.

१३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९४५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मेसर्स युनिटी इन्फ्रा प्रोजेक्टस् यांच्या रु.५३,१२,५८,९६५/- (रुपये त्रेपन्न कोटी बारा लाख अठ्ठावन्न हजार नऊशे पासष्ट मात्र) एवढ्या रक्कमेच्या सर्वात लघुत्तम सुसंवादी देकारास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** कामाचा ठेका देणे व त्याची यशस्वी पूर्तता करणे यासाठी महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कनिष्ठ लेखाधिकारी या पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये बदल करण्याबाबत. (गोपनीय)**

**१४.१** या प्रस्तावासंबंधात माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीने सन १९८४ मध्ये प्राधिकरणातील विविध पदांचे तसेच कनिष्ठ लेखाधिकारी पदाचे सेवाप्रवेश नियम तयार केले आहेत. सन १९८४ मध्ये तयार केलेले कनिष्ठ लेखाधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम हे आता कालबाहय झालेले आहेत. यास्तव कनिष्ठ लेखाधिकारी पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये, बदल करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**१४.२** चर्चेनंतर, कार्यकारी समितीने प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९४६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कनिष्ठ लेखाधिकारी या पदाचे सेवाप्रवेश नियम खालीलप्रमाणे सुधारीत करण्यास कार्यकारी समिती याद्वारे मंजूरी देत आहे :-

कनिष्ठ लेखाधिकारी या पदाचे सुधारीत सेवाप्रवेश नियम

आवश्यक अर्हता : सदर संवर्गातील पदे ही सरळ सेवाप्रवेश (५०%) व पदोन्नतीने (५०%) भरण्यात येतील. पदोन्नतीने पदे भरावयाची असल्यास उपलेखापाल या पदावर पाच वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे व मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी असणे आवश्यक आहे.

सरळसेवेने पद भरावयाचे असल्यास खुल्या प्रवर्गाकरीता मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या वाणिज्य शाखेतील प्रथमश्रेणीतील पदवीधारकास ६०% गुण आवश्यक आहेत किंवा वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर पदवी असल्यास द्वितीय श्रेणी असणे आवश्यक आहे. मागासवर्गीय उमेदवारास तसेच प्राधिकरणातील इतर उमेदवारास ही अट १०% गुणांनी शिथिल करण्यात येत असून इतर सर्व अटी जशाच्या तशा लागू राहतील.

वय : ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे (प्राधिकरणातील कर्मचा-यांना वयाची अट लागू नाही).

अनुभव : पाच वर्षाचा वाणिज्यिक कार्यालयातील किंवा शासनातील किंवा शासकीय वाणिज्यिक उपक्रमातील वित्त व लेखा विभागाचा अनुभव. याशिवाय संगणकाची माहिती असणे आवश्यक.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वित्त व लेखा विभगातील कनिष्ठ लेखाधिकारी व त्यावरील पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील पदवी असणे आवश्यक आहे."

**<u>बाब क्र.१५</u> : <u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ ऑक्टोबर, २००४ ते दिनांक १५ डिसेंबर, २००४.</u>**

प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत अहवालाची नोंद घेण्यात आली.

**<u>बाब क्र.१६</u> : <u>दिनांक ३१ सप्टेंबर, २००४ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.</u>**

प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने त्रैमासिक लेख्याची नोंद घेतली.

**<u>बाब क्र.१७</u> : <u>ओशिवरा जिल्हा केंद्राच्या नियोजन प्रस्तावाची अंमलबजावणी अभिहस्तांकना विषयक प्रारुप भाडेपट्टा करारात असलेल्या तरतुदींमध्ये सुधारणा करणेबाबत.</u>**

१७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी ओशिवरा अधिसूचित जिल्हा केद्रांच्या नियोजन व विकास प्रस्तावानुसार या क्षेत्रातील जमीनमालकांकडून जमिनी संपादित करणे व त्या ६० वर्षाच्या भाडेपट्टयाने जमीनमालकास परत करण्याच्या तरतूदींबाबत माहिती दिली. ओशिवरा जिल्हा केंद्राच्या अधिसूचित क्षेत्रातील काही विकासकर्त्यांच्या / जमिनधारकांच्या विनंतीवरुन प्राधिकरणाच्या दिनांक २२ मे, १९९५ रोजी झालेल्या ७८ व्या बैठकीमध्ये जमीन विकासासाठी हस्तांतरीत करताना करावयाच्या करारपत्रामध्ये जमीन किंवा तिचा भाग प्राधिकरणाच्या पूर्व परवानगीने परंतू हस्तांतर आकार न देता विकणे, गहाण ठेवणे, अभिहस्तांकन करणे, पोटभाडयाने देणे यास परवानगी असावी अशी सुधारणा अभिहस्तांकनाविषयक असलेल्या तरतूदीमध्ये करण्याचा प्रस्ताव सादर केला होता. परंतु या हस्तांतरणाच्या प्रकारापैकी फक्त "पोटभाडयाने" देण्यास परवानगी असावी या शब्दाचा अंतर्भाव मान्य झालेल्या ठरावात होता. महानगर आयुक्तांनी पुढे असे सांगितले की, सदर ठरावातील "पोटभाडयाने" ही संज्ञा हस्तांतरणाच्या सर्व प्रकरणी प्रातिनिधिक स्वरुपाची म्हणून वापरण्यात आली

आहे, असे गृहीत धरुन मे.मॉटेक्स कॉर्पोरेशन यांना हस्तांकनाची परवानगी देण्यात आली. परंतु प्राधिकरणाच्या वैधानिक लेखा परिक्षकांनी (महालेखाकार) सन १९९९-२००० वित्तीय वर्षाच्या लेख्याचे लेखापरिक्षण करताना मे.मॉटेक्स कॉर्पोरेशन यांना अभिहस्तांतरणाबाबत दिलेल्या परवानगी प्रकरणी असा आक्षेप घेतला आहे की, प्राधिकरणाने केलेल्या ठरावानुसार देय असलेली परवानगी ही फक्त पोटभाडयाने देण्याबाबतची आहे. त्यामुळे इतर प्रकरणी म्हणजेच जमीन गहाण ठेवणे, जमिनीची विक्री, जमीन अभिहस्तांकित करणे किंवा अन्य कोणत्याही रितीने जमीन किंवा तिचा काही भाग किंवा त्यामधील त्यांचे हितसंबंध हस्तांतरीत करणे या प्रकरणी प्राधिकरणाने हस्तांतर आकार वसूल करणे आवश्यक आहे. सदर आक्षेपानुसार मे.मॉटेक्स कॉर्पोरेशन यांनी १% इतका अभिहस्तांकन आकार मागणीनुसार भरला आहे. तसेच अभिहस्तांकन प्रकरणी दुसरी परवानगी मे.वंडरलॅन्ड इस्टेट डेव्हलपर्स प्रा. लि. यांस देतानाही भाडेपट्टा अधिमुल्यांच्या १% अभिहस्तांकन आकार वसूल करुन अभिहस्तांकनास परवानगी देताना प्राधिकरणाने दिनांक २२ मे, १९९५ च्या ठराव क्रमांक ६३१ अन्वये घेतलेल्या निर्णयासंदर्भात दुरुस्तीविषयक प्रस्ताव प्राधिकरणास सादर करुन सदर अभिहस्तांकनास कार्योत्तर मान्यता घेण्याचा कार्यालयाने निर्णय घेतला होता.

१७.२ महानगर आयुक्तांनी पुढे असे नमुद केले की, ओशिवरा जिल्हा केंद्रामध्ये उपरोक्त नमूद जमीनमालक /विकासक यांचेसह अजूनही काही जमीनमालकांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत. त्यांचे प्रकरणीही अभिहस्तांकरणाविषयक प्रस्ताव पुढील कालावधीमध्ये येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे याप्रकरणी सुस्पष्टता असणे आवश्यक आहे. सबब, वरील मुद्दयांचा विचार करुन प्राधिकरणाच्या दिनांक १९ नोव्हेंबर, २००४ रोजी झालेल्या ११२ व्या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला होता -

(१) मे.मॉटेक्स कॉर्पोरेशन प्रा.लि. व मे.वंडरलॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांचे संदर्भात केलेल्या अभिहस्तांकनास परवानगी देताना भाडेपट्टा अधिमूल्याच्या १% इतका अभिहस्तांकन आकार वसूल करावयाच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी द्यावी,

(२) यापूर्वी दिनांक २२ मे, १९९५ रोजी प्राधिकरणाच्या ७८ व्या बैठकीमध्ये पारीत केलेल्या ठराव क्र.६३१ मध्ये वरीलप्रमाणे अंशतः फेरबदल करुन हस्तांकरण प्रकरणी पोटभाडयाने देण्याच्या बाबींसह उर्वरित म्हणजेच जमीन अभिहस्तांकन करणे, गहाण ठेवणे किंवा तीचा ताबा कोणत्याही अन्य रितीने हस्तांतरीत करणे या बाबींचाही समावेश करावा व भाडेपट्टा अधिमूल्याच्या १% इतका अभिहस्तांकन आकार लागू करण्यास मान्यता द्यावी,

(३) उपरोक्त फेरबदलाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) (दुरुस्ती) विनियम, १९९७ अंमलात आल्याच्या दिनांकापूर्वी (म्हणजेच २९ एप्रिल १९९७ पर्यंत) च्या प्रकरणी पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात यावी व यापुढील प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) (दुरुस्ती) विनियम, १९९७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

परंतू कार्यकारी समितीची या प्रस्तावास शिफारस घेण्यासाठी प्राधिकरणाच्या परवानगीने हा प्रस्ताव मागे घेण्यात आला. त्यानुसार आता सदर प्रस्ताव कार्यकारी समितीच्या विचारार्थ व प्राधिकरणास शिफारस करावी यासाठी सादर केला आहे.

१७.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावावर विचार करुन व तो मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९४७</u> :

"कार्यकारी समिती या ठरावाद्वारे प्राधिकरणास पुढीलप्रमाणे शिफारस करीत आहे -

(१) मे.वंडरलॅन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. व मे. मॉन्टेक्स कॉर्पोरेशन प्रा.लि. यांचे संदर्भात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अंतर्गत प्र नमूना - डी मधील भाडेपट्टा कराराच्या तरतूदीनुसार अभिहस्तांकनास परवानगी देताना भाडेपट्टा अधिमूल्याच्या १% (एक टक्का) इतका अभिहस्तांकन आकार वसूल करावयाच्या महानगर आयुक्त यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.

(२) अभिहस्तांकन आकार वसूल करावयाच्या वरील कार्यवाहीच्या आधारे दिनांक २२ मे, १९९५ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ७८ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठराव क्र. ६३१ मध्ये नमुद केलेल्या परिच्छेद ५.१ मधील अनुक्रमांक ३ च्या तरतुदीमध्ये पुढीलप्रमाणे अंशतः बदल करावा -
'अभिहस्तांकन प्रकरणी जमीनधारकांना किंवा हस्तांतरणकर्त्यांना जमिनीचे अभिहस्तांकन करणे, जमीन गहाण ठेवणे, जमिनीची विक्री करणे, ती अभिहस्तांतरीत करणे किंवा अन्य कोणत्याहीरीत्या जमीन किंवा तिचा भाग किंवा तीमधील त्यांचे हितसंबंध हस्तांतरीत करण्यास भाडेपट्टा अधिमूल्याच्या १% इतका हस्तांतर आकार घेऊन परवानगी देण्यात यावी'.

(३) उपरोक्त फेरबदलाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) (दुरुस्ती) विनियम, १९९७ अंमलात आल्याच्या दिनांकापूर्वी (म्हणजेच दिनांक २९ एप्रिल, १९९७ पर्यंत) च्या प्रकरणी पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात यावी आणि या पुढील प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) (दुरुस्ती) विनियम, १९९७ नुसार कार्यवाही करण्यात यावी."

**बाब क्र.१८ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) - महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्राधान्यक्रमाने हाती घेतलेल्या उड्डाणपूलांच्या सुधारीत अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता देणे.**

१८.१ या प्रस्तावासंबंधात माहिती देताना अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतला आहे. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या बृहत आराखडयास प्राधिकरणाने तसेच महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली. त्यानुसार निरनिराळया कामांसाठी सर्वंकष अभियांत्रिकी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची जुलै/ऑगस्ट, २००३ मध्ये नेमणूक करण्यात आली. सल्लागारांनी त्यांच्या अभ्यासास जुलै, २००३ पासून सुरुवात केली. त्यापैकी १७ प्रमुख छन्नमार्गांसाठी सविस्तर (Detailed) अंदाजपत्रके व आराखडे तयार केले व त्यावरील ३७ कामांसाठी नोव्हेंबर, २००३ मध्ये निविदा मागविण्यात आल्या. कार्यकारी समितीच्या पूर्वमंजूरीने ३२ कामांसाठी फेब्रुवारी, २००४ मध्ये व ४ कामांसाठी जून, २००४ मध्ये कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली. प्रकल्पाचा पूर्वानूभव विचारात घेऊन दिनांक ६ ऑगस्ट, २००४ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २०८ व्या बैठकीत कार्यकारी समितीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ९ उड्डाणपूलांच्या उभारणीकरीता प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणून नेमणूक करणाच्या प्रस्तावास मान्यता दिली. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास त्या रस्त्यांच्या उभारणीकरीता प्राधिकरणाने नेमणूक केलेल्या संकल्पचित्र व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या सेवांचा वापर करुन घेण्यास सांगण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सदर ९ पैकी ६ उड्डाणपूल व जोडरस्त्यांसाठी सल्लागारांकडून प्राथमिक अंदाजपत्रके तयार करुन घेतली आहेत. सदर अंदाजपत्रकांनुसार उड्डाणपूलांच्या खर्चामध्ये तांत्रिक बाबींच्या बदलामुळे तफावत आली आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे सदर ६ उड्डाणपूलांचा अंदाजित खर्च रु.५९.३५ कोटीवरुन रु.१८६.९९ कोटी इतका वाढला आहे. यापैकी खेरवाडी व सांताक्रुझ येथील उड्डाणपूलांचा खर्च असाईड योजनेंतर्गत व उर्वरित उड्डाणपूलांचा खर्च मेगासिटी योजनेंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे. प्राधिकरणाच्या निधीमधून सदर कामांकरीता खर्च करण्यात येणार नाही. आता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास, बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, ६ उड्डाणपूलांची कामे हाती घेण्याच्या दृष्टीने सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

१८.२ अतिरिक्त महानगर आयुक्त व प्रकल्प संचालक यांनी असे सुचविले की, असाईड व मेगासिटी योजनेसाठी प्राधिकरण काही निधी उपलब्ध करुन देणार आहे. म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ उड्डाणपूलांवर अधिभार लावते त्या अधिभाराच्या उत्पन्नातील काही भाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात यावा.

१८.३ कार्यकारी समितीने वरील सूचनेस सहमती दर्शविली. तसेच बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९४८ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (दोन) व (तीन) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे हाती घेतलेल्या प्राधान्यक्रम-१ मधील खालील उड्डाणपूलांच्या कामांच्या सुधारीत अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता देत आहे. सदर प्रकल्पांसाठीचा खर्च असाईड (ASIDE) व मेगासिटी निधीमधून करण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने तयार केलेले सुधारीत अंदाजपत्रकीय एकूण खर्च (रुपये कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १. | खेरवाडी जंक्शन, पश्चिम द्रुतगती महामार्ग | ४०.८५ |
| २. | दिंडोशी जंक्शन, पश्चिम द्रुतगती महामार्ग | १३.०२ |
| ३. | टाईम्स ऑफ इंडिया जंक्शन, पश्चिम द्रुतगती महामार्ग | २६.२८ |
| ४. | ठाकूर कॉम्प्लेक्स जंक्शन, पश्चिम द्रुतगती महामार्ग | ३१.७८ |
| ५. | सुमन नगर जंक्शन, पूर्व द्रुतगती महामार्ग (उड्डाणपूल + भुयारी मार्ग) | १६.६५ |
| ६. | बर्फीवाला जंक्शन, एस.व्ही.मार्ग (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ) आणि लोखंडवाला चौकापर्यंत बांधकाम तसेच एन.एस.फडके मार्गावरील बांधकाम (एमएमआरडीए) | ५८.४१ |
| | एकूण खर्च | १८६.९९ |

**<u>बाब क्र.१९</u> : <u>श्री.एस.पी.पेंढारकर, विशेष कार्य अधिकारी यांचा कंत्राट कालावधी वाढविण्याबाबत. (गोपनीय)</u>**

१९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, श्री.एस.पी.पेंढारकर हे प्रमुख, नियोजन विभाग या पदावरुन प्राधिकरणाच्या सेवेतून दिनांक ३१ मे, २००४ रोजी निवृत्त झाल्यानंतर यांची प्राधिकरणामध्ये कंत्राट पध्दतीवर रु.३७,३००/- प्रतिमाह या मासिक वेतनावर दिनांक १ जून, २००४ ते ३० नोव्हेंबर, २००४ पर्यंत प्रथमतः ६ महिन्याकरीता 'विशेष कार्य अधिकारी' म्हणून नेमणूक केली होती. महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीचे काम अद्याप प्रगतीपथावर आहे व सदर कामासाठी श्री.पेंढारकर यांच्या सेवेची आवश्यकता आहे. म्हणून अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या मान्यतेने श्री.पेंढारकर यांना दिनांक १ डिसेंबर, २००४ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २००५ पर्यंत पुढील ३ महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राट पध्दतीवरील सेवावाढ देण्यात आली. आता श्री.पेंढारकर यांनी करावयाच्या कामाचे पुनर्विलोकन केले असता असे दिसून आले की, महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीचे काम साधारणतः दोन महिन्यात पूर्ण होऊ शकेल. तसेच या अवधीत श्री.पेंढारकर यांनी मूलतः नेमणूक देताना जी कामे करावयाची होती तीहि करावयाची आहेत. त्यानुसार श्री.पेंढारकर यांना दिनांक १ डिसेंबर, २००४ ते दिनांक ३१ जानेवारी, २००५ पर्यंत २ महिन्याचा कालावधी वाढवून देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

१९.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९४९</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट कलम (एक) आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे श्री.एस.पी.पेंढारकर यांना पुढील २ महिन्याकरीता म्हणजे दिनांक १ डिसेंबर, २००४ ते ३१ जानेवारी, २००५ पर्यंत 'विशेष कार्य अधिकारी' म्हणून कंत्राट पध्दतीवरील नियुक्तीस मुदतवाढ देण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** श्री.एस.पी.पेंढारकर यांना सध्या देण्यात येणा-या सर्व सुविधा म्हणजे निवास ते कार्यालय व परत या प्रवासासाठी कार्यालयीन वाहन, पेपर बिलाची प्रतिपूर्ती, मोबाईल फोन, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती इत्यादी यापुढेही त्यांच्या कंत्राट कालावधीमध्ये देण्यास कार्यकारी समिती याद्वारे मंजूरी देत आहे. सदर कालावधीमध्ये श्री.एस.पी.पेंढारकर यांना भविष्य निर्वाह निधी, अंशदान व इतर कोणत्याही वित्तीय सवलती देय होणार नाहीत."

**बाब क्र.२० : शिस्तभंगविषयक कार्यवाहीसाठी सक्षम अधिकारी व अपिलीय प्राधिकारी ठरविण्याबाबत.**

२०.१ या बाब टिप्पणीसंबंधात माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणातील विभाग प्रमुख वगळून इतर सर्व अधिकारी / कर्मचा-यांच्या नेमणूकीचे अधिकार कार्यकारी समितीने महानगर आयुक्तांना प्रदान केले आहेत. तसेच प्राधिकरणातील अधिकारी (विभाग प्रमुख वगळून) व कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे अधिकारही कार्यकारी समितीने महानगर आयुक्तांना प्रदान केले आहेत. शिस्तभंगाची कार्यवाही झालेल्या कर्मचारी / अधिका-यास महानगर आयुक्तांनी दिलेली शिक्षा मान्य नसल्यास अपिल करण्यासाठी अपिलीय प्राधिकारी आवश्यक आहे. प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी सल्ला दिला आहे की, कार्यकारी समिती अपिलीय प्राधिकारी निश्चित करु शकते. त्यानुसार, कार्यकारी समितीच्या सदस्यांपैकी शासनाचे प्रधान सचिव, नगर विकास विभाग आणि श्री.र.य.तांबे यांच्या समितीस अपिलीय प्राधिकारी म्हणून नियुक्त करावे असा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

२०.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९५० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम ५ तसेच बॉम्बे जनरल क्लॉज ॲक्टच्या कलम १६ मधील तरतुदींनुसार कार्यकारी समिती याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कर्मचारी / अधिका-यांवरील (विभाग प्रमुख वगळून) शिस्तभंगविषयक कार्यवाहीसंबंधात महानगर आयुक्तांनी पारित

केलेल्या आदेशाबाबतीत अपिलीय प्राधिकारी म्हणून शासनाचे प्रधान सचिव, नगर विकास विभाग आणि श्री.र.य.तांबे, सदस्य, कार्यकारी समिती यांच्या समितीस नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे."

**बाब क्र.२१ :** **बॉम्बे फर्स्टच्या दिनांक १८ व १९ फेब्रुवारी, २००५ रोजी होणा-या नागरी पुनर्नूतनीकरण या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद सह-पुरस्कृत करणेसाठी रु.३.०० लाख पुरस्कृत करणेबाबत.**

२१.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागरी पुनर्नूतनीकरणाच्या सर्व समावेशक धोरणांची रुपरेषा निश्चित करण्याच्या उद्देशाने बॉम्बे फर्स्ट यांनी दिनांक १८ व १९ फेब्रुवारी, २००५ रोजी दोन दिवसांची आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्याचे ठरविले आहे. सदर परिषदेतील प्राधिकरणाच्या सहभागाची तसेच परिषदेसाठी रु.७.५० लाखांच्या सह-पुरस्कृतीची अपेक्षा बॉम्बे फर्स्टने व्यक्त केली आहे. त्यानुसार या आंतरराष्ट्रीय परिषदेतील सहभागासाठी तसेच परिषेदेचे संयोजक बॉम्बे फर्स्ट यांना रु.३ लाख देऊन सदर परिषद सह-पुरस्कृत करण्यासाठी कार्यकारी समितीने मान्यता द्यावी.

२१.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.९५१ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समिती याद्वारे मुंबईच्या नागरी पुनर्नूतनीकरण या विषयावरील २ दिवसांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेतील सहभागास, तसेच सदर परिषदेचे संयोजक बॉम्बे फर्स्ट यांना रु.३ लाख ही रक्कम देऊन सदर परिषद सह-पुरस्कृत करण्यास मान्यता देत आहे."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

—— oooooooooo ——